संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com








वर्ष : ६ वे ● ● अंक : १२३ ● ● शनिवार दि. २३ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021


# दूध आणि पोषण आहार पुरवठ्यात कोट्यवधींचा घोटाळा : आम. रोहित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पुणे : राज्यातील आदिवासी शाळांमध्ये ८० कोटींचा, तर सामाजिक न्याय विभागाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या पोषण आहारात २५० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. यासाठी आंबेगाव तालुक्यातील एका खासगी दूध उत्पादक संस्था आणि कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील सहकारी दूध उत्पादक संस्था दूध घोटाळ्यात सहभागी आहे. तर क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ई-कॅमर्स सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड मनुष्यबळ पुरविणाऱ्या कंपन्यांना शालेय पोषण आहारात कंत्राट देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

रोहित पवार यांनी कोणत्याही नेत्याचे नाव घेतले नसले तरी, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रिफ, प्रसाद लाड या नेत्यांशी या संस्था आणि कंपन्या संबंधित आहेत. रोहित पवार यांची ईडीकडून चैकशी सुरू करण्यात आल्यानंतर काही दिवसांपूर्वी त्यांनी सरकारमधील काही मंत्र्यांच्या गैरव्यवहाराची प्रकरणे पुढे आली असून ती जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार त्यांनी शुक्रवार पत्रकार परिषद घेतली.

राज्यातील ५५२ आश्रम शाळेतील १ लाख ८७ हजार ३९२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५० मिलीलिटर दूध पुरविण्याचा



पुणे : येथे पत्रकार परीषेत मध्ये माहिती देताना आमदार रोहित पवार

निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी पहिला करार २०१८-१९ आणि दुसरा करार २०२३-२४ मध्ये करणयात आला. एखाद्या संस्थेला दूध पुरवठा करण्याचे कंत्राट दिले जाते. त्यासाठी निविदा काढल्या जातात आणि ज्याची बोली कमी त्याला काम दिले जाते. २०१८-१९ मध्ये ४६.४९, ४९.७५ प्रती लिटर दराने निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या करारावेळी शासनाने २०० मिलीलिटर टेट्रा पॅक २९.२० रुपये दराने खरेदी केला. त्यामुळे एका लिटरचा भाव १४६ रुपये झाला. राज्यातील शेतकऱ्यांना ३० रुपयांपेक्षा कमी दर दिला जात असताना एका संस्थेला १४६ रुपये प्रति लिटर दर दिला असून त्यामध्ये ८० कोटींचा भ्रष्टाचार झाला असून पराग मिल्क आणि वारणा दूध या कंपन्या कोणाशी संबंधित आहेत, अशी विचारणा रोहित पवार यांनी केली.

ते म्हणाले की, समाजकल्याण विभागातही कंत्राट आणि उपकंत्राटे देऊन २५० कोटींचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे. राज्यातील ४४३ शासकीय वसतिगृहे असून त्यामध्ये ४२ हजार ९८६ तर ९३ शासकीय निवासी शाळांमध्ये १४ हजार ४०० विद्यार्थी आहेत. अशा एकूण ५७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट दिले जाते. २०१९-२० मध्ये स्थानिक स्तरावर निविदा काढून प्रति विद्यार्थी प्रति महिना ४००० हजार याप्रमाणे कंत्राट दिले जात होते. २०२२ मध्ये प्रति विद्यार्थी ५ हजार २०० रुपये दराने निविदा काढण्यात आले. त्यामध्ये थेट २५ टक्के वाढ करण्यात आली.

ज्या कंपन्यांना कंत्राट मिळाले आहे त्या कंपन्या सरकारमधील लोकांशी संबंधित आहेत. प्रति वर्षी ३५० कोटी याप्रमाणे तीन वर्षांत १ हजार ५० कोटींचे कंत्राट देण्यात आले असून त्यामध्ये २५० कोटींचा घोटाळा करण्यात आला आहे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ई-कॅमर्स सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना शालेय पोषण आहाराचे कंत्राट देण्यात आल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला.

# सांगलीत पाच लाखांचा गुटखा जप्त

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्नाटक सीमेवर उभारण्यात आलेल्या तपासणी नाक्यामुळे पाच लाखांची गुटखा तस्करी म्हैसाळ येथे उघडकीस आली. या प्रकरणी चालकाला अटक करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्व भूमीवर जिल्ह्यात कर्नाटक सीमेलगत असलेल्या रस्त्यावर ९ तपासणी नाके ठेवण्यात आले आहेत. यांपैकी कागवाड रस्त्यावरील म्हैसाळ तपासणी नाका महत्वाचा मानला जातो. या ठिकाणी २४ तास पोलीसांचा सक्त पहारा असून येणार्यां सर्व वाहनांची कडकपणे तपासणी केली जात आहे.

तपासणी करत असताना गुरूवारी दुपारी वाहनाची (एमएच १० एक्यू ५३८४) याची झडती घेतली असता बंदी असलेल्या गुटख्याची पोती आढळली. वाहनात पोत्यात भरलेली विमल मसाला, विमल तंबाखू, विमल किंग तंबाखू व किंग तंबाखू असा सुमारे पाच लाखाचा गुटखा आढळून आला. या प्रकरणी मिरज ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी गुटख्यासह वाहन जप्त केले असून अकबर शेख (वय ४५ रा. शंभर फुटी रोड, पाकिजा मस्जिदजवळ सांगली) याला ताब्यात घेण्यात आले आहे. वाहनही जप्त करण्यात आले आहे. याबाबत रात्री उशीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिला सरपंचाला मासिक सभेत सदस्यांकडून मारहाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

विटा : ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत महिला सरपंचाला महिला सदस्यांकडून जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करण्याचा प्रकार चिंचणी मंगरूळ (ता.खानापूर) मध्ये बुधवारी घडला. या प्रकरणी विटा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

याबाबत माहिती अशी, चिंचणी मंगरूळ या गावी बुधवारी मासिक सभा होती. सरपंच रेवती भोसले यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या मासिक सभेस ग्रामविस्तार अधिकारीही उपस्थित होते. गेले काही दिवस सरपंच मनमानी कारभार करत असल्याचा आरोप काही सदस्यांकडून होत होता. यामुळे काही सदस्य मासिक सभेस अनुपस्थित राहत होते. बुधवारच्या बैठकीवेळी प्रभागातील पाणी का बंद आहे. या कारणावरून सरपंच श्रीमती भोसले आणि सदस्या शुभांगी सुर्वे यांच्यात वाद झाला.

या वादात श्रीमती सुर्वे यांनी सरपंच महिलेचे ओढाओढीत बोट मोडले आणि त्यांना तुझी पात्रता नसताना तुला मी सरपंच केले. तेच माझं चुकले, असे म्हणत वैयक्तिक पातळीवर जाऊन टीकाटिप्पणी केली. तसेच जातीवाचक बोलून अवमान केल्याची तक्रार विटा पोलीस ठाण्यात रात्री उशिरा दाखल करण्यात आली. यानुसार सुर्वे यांच्याविरुद्ध गुन्हा टाखल करण्यात आला आहे.

# अरविंद केजरीवालांना सहा दिवसांची ईडी कोठडी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

नवी दिल्ली : मद्य धोरण घोटाळाप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (आप) अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी रात्री अटक केल्यानंतर त्यांना शुक्रवारी (दि.२२) राऊस व्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना न्यायालयाने २८ मार्चपर्यंत सहा दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. केजरीवाल यांना आता २८ मार्च रोजी दुपारी २ वाजता कोर्टात हजर केले जाणार आहे. विशेष न्यायमूर्ती कावेरी बावेजा यांच्यासमोर ही सुनावणी झाली. यावेळी मद्य धोरण घोटाळाप्रकरणी केजरीवाल यांच्या १० दिवसांची कोठडीची मागणी ईडीकडून करण्यात आली होती.

केजरीवाल यांना गुरुवारी रात्री सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) अटक करण्यात आली. शुक्रवारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. गुरुवारी रात्री ९.०५ वाजता केजरीवाल यांना अटक करण्यात आली.



अरविंद केजरीवाल

त्यांच्या १० दिवसांच्या कोठडीसाठी अर्ज दिला आहे, असे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (-SG) एसव्ही राजू न्यायालयासमोर सांगितले. यावेळी राजू यांनी यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या सेंथिल बालाजी प्रकरणाच्या निकालाची प्रत न्यायालयाला दिली. त्यांनी निकालातील संबंधित परिच्छेद वाचून दाखवले.

अरविंद केजरीवाल हे दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याचे सूत्रधार आहेत. या धोरणाच्या अंमलबजावणीत त्यांचा थेट सहभाग असल्याचा युक्तिवाद राजू यांनी केला. विजय नायर केजरीवाल यांच्या घराशेजारील घरात राहत होते. ते आम आदमी पक्षाचा मीडिया प्रभारी होते. त्यांनी (विजय नायर) आम आदमी पक्ष आणि दक्षिण गट यांच्यात मध्यस्थ म्हणून काम केले, असे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजू यांनी म्हटले.

दक्षिण ग्रुपला फायदा करून देण्याच्या बदल्यात केजरीवाल यांनी त्यांच्याकडून मोबदल्याची मागणी केली. त्यांना फायदा करून देण्याच्या बदल्यात केजरीवाल यांनी दक्षिण ग्रुपकडून मोबदल्याची मागणी केली. यातून सुमारे दक्षिण ग्रुपकडून मिळालेले ४५ कोटी आम आदमी पक्षाने गोव्यातील २०२१-२२ मधील प्रचारासाठी वापरले. चेन्नईहून पैसा आला आणि तो गोव्यात गेला, असा दावा एसव्ही राजू यांनी युक्तिवादादरम्यान केला. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल चौकशीला सहकार्य करत नसल्याचे ईडीकडून न्यायालयात सांगण्यात आले.

# कडेगावात मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कडेगाव : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने पलूस कडेगांव विधानसभा मतदारसंघ अंतर्गत तहसील कार्यालय कडेगांव, कडेगांव नगरपंचायत कडेगांव व मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली.

यावेळी अजित शेलार तहसीलदार कडेगांव, डॉ पवन म्हेत्रे मुख्याधिकारी कडेगांव नगरपंचायत, व्ही.वाय. कदम प्राचार्य कन्या महाविद्यालय, कडेगांव नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी आणि मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थीनी उपस्थित होते.




कडेगाव : येथे मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी उपस्थित विद्यार्थी व शिक्षक

# आटपाडीत सेवानिवृत्त संघटनेकडून गटविकास अधिकारी यांचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेची बैठक जिल्हा उपाध्यक्ष माणिकराव खंडागळे, तालुका अध्यक्ष अशोक मोटे, सरचिटणीस अशोक गुरव, जिल्हाकार्यकारिणी सदस्य विजय राजमाने यांच्या उपस्थित संपन्न झाली.

यावेळी गटविकास अधिकारी श्री गावडे यांचा सेवानिवृत्त संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्यासमोर सेवानिवृत्त शिक्षकांच्या अनेक प्रश्नाविषयी चर्चा करण्यात आली. सेवानिवृत्ताचे जे काही प्रश्न असतील ते तातडीने सोडविले जातील, ३१ मार्चपूर्वी ग्रॅज्युएटी व पेन्शन विक्री रक्कम सेवानिवृत्तांना दिली जाईल. तसेच सातवा वेतन आयोगाचे हप्ते सुद्धा ३१ मार्चपूर्वी देण्यात येतील असे आश्वासन दिले. यावेळी वीस हजार मानधनावरील शिक्षकांचे काम बंद बहिष्कार पत्र गटविकास अधिकारी यांना देण्यात आले. या पत्राचा गांभीर्याने विचार करून मानधन लवकरात लवकर कसे मिळेल याबाबत प्रयत्न केले जातील असे सांगितले. यावेळी विविध विषयावर सकारात्मक चर्चा झाली.



आटपाडी : गटविकास अधिकारी श्री. गावडे यांचा सत्कार करताना सेवानिवृत्त संघटनेचे माणिकराव खंडागळे, अशोक मोटे, विजय राजमाने व उपस्थित मान्यवर

# फॅबटेक इंजिनिअरिंगला 'नॅक' चे 'ए' मानांकन

## गुणवत्तेची परंपरा कायम राखल्याचा मान : भाऊसाहेब रुपनर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगोला : येथील फॅब्रटेक एज्युकेशन सोसायटी संचलित फॅब्रटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ला देशातील शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण असलेले 'नॅक' अर्थात 'नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिल' चे 'ए ' हे मानांकन मिळाले आहे., अशी माहिती इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे यांनी दिली.

'नॅक'च्या प्रक्रियेचा भाग म्हणून महाविद्यालयाने पूर्वी एसएसआर (सेल्फ स्टडी रिपोर्ट) 'नॅक' कडे जमा केलेला होता. त्यानंतर महाविद्यालयाने पुरवलेल्या माहितीची पडताळणी झाल्यानंतर दि. ११ व १२ मार्च २०२४ या दोन दिवशी 'नॅक'च्या त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन महाविद्यालयातील सर्व भौतिक सुविधा, अध्ययन-अध्यापन पद्धती, विद्यार्थी पूरक सुविधा, महाविद्यालयाची शैक्षणिक उद्दीष्टे, अभ्यासक्रमाचा दर्जा व त्याची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिक्षकांची गुणवत्ता, शैक्षणिक व पायाभूत सुविधा, कॅम्पस प्लेसमेंट, संशोधन तसेच यापूर्वी मिळालेल्या मानांकनापासून ते आतापर्यंत महाविद्यालयाने केलेली प्रगती व इतर महत्वपूर्ण बाबींची शहानिशा करून आपला अहवाल 'नॅक' कडे सादर केलेला होता.

> ग्रामीण भागातील फॅब्रटेक महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यापुढील काळात संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांचे मानांकन उंचाविण्यासाठी गुणवत्ता वाढीवर अधिक भर दिला जाईल.
>
> **भाऊसाहेब रुपनर, चेअरमन**

'नॅक' चे हे मानांकन मिळाल्यामुळे फॅब्रटेकच्या शिक्षणाच्या दर्जावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. 'नॅक' ही शैक्षणिक संस्थांना मानांकन देणारी देशातील स्वायत्त संस्था असून 'नॅक'चे मानांकन असणाऱ्या शिक्षण संस्थांना एक वेगळी ओळख प्राप्त होत असते. या मानांकनामुळे विद्यार्थी, पालक, नोकऱ्या देणाऱ्या कंपन्या व इतर समाज घटकांना येथील शिक्षणाच्या उच्च दर्जाबाबत खात्री मिळत असते. या मानांकनामुळे महाविद्यालयाला एक उच्च दर्जाचे गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाल्याने, महाविद्यालयास विविध संस्थाकडून अधिक संशोधन निधी मिळण्यास मदत होईल. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.संजय अदाटे, संचालक डॉ.डी.एस.बाडकर यांनी या मानांकनाबद्दल प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

> 'नॅक'चे 'ए' मानांकन हे महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेला साजेसे आहे. मानांकनासाठी महाविद्यालयातील सर्व घटकांनी विशेष मेहनत घेतली.त्याचे हे फळ आहे. यापुढील काळात महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा कायम राखण्यास कायम कटिबद्ध आहे.
>
> **डॉ. अमित रुपनर**
> **मॅनेजिंग डायरेक्टर**

# ग्रंथाबाबत सूचना, हरकती असल्यास पाठविण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेंतर्गत ४८ व ४९ व्या ग्रंथ भेट योजनेंतर्गत ग्रंथांच्या खरेदीसाठी सन २०२१ व सन २०२२ मध्ये प्रकाशित व ग्रंथालय संचालनालयास प्राप्त ग्रंथांपैकी निवड केलेल्या मराठी ४८५, हिंदी २०४ व इंग्रजी २२१ अशा एकूण ९१० ग्रंथांची निवड करण्यात आली आहे. या ग्रंथांची यादी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या https://htedu.maharashtra.gov.in/Main/ या संकेतस्थळावर १८ ते ३० मार्च २०२४ या कालावधीत अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. या ग्रंथ यादीतील ग्रंथ किमान ३० टक्के सूट दराने वा त्यापेक्षा अधिक सूट दर देण्यास तयार असल्यास त्या सूट दराप्रमाणे ग्रंथांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. याबाबत प्रकाशक, वितरकांनी देयकात स्पष्टपणे नमूद करावे. या संदर्भात यादीतील कोणत्याही ग्रंथाबाबत सूचना, हरकती, आक्षेप असल्यास ३० मार्च २०२४ पर्यंत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगरभवन, मुंबई- ०१ यांच्याकडे लेखी स्वरूपात कार्यालयीन वेळेत हस्तबटवड्याने, पोस्टाने किंवा ई-मेलवर मुदतीत पाठवावेत. त्यानंतर आलेल्या सूचना, हरकती आणि आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच यादीत ग्रंथाचे नाव, लेखक, प्रकाशक, किंमतीत काही बदल असल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

## * संपादकीय *

# ‘पाणी’ग्रहण!

निवडणुकांच्या ऐन धामधुमीत ‘लोकसत्ता’ने गुरुवारी (२१ मार्च) राज्यातील पाणीटंचाईचे गांभीर्य दर्शवणाऱ्या वृत्तास मुख्य मथळ्याचे स्थान दिले. मार्चदेखील अजून संपलेला नाही आणि राज्यातील सुमारे तीन हजार गावे आताच टँकरग्रस्त झाली असून धरणांतील सरासरी पाणीसाठा जेमतेम ४१ टक्क्यांवर आलेला आहे. दक्षिणेतील आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा आणि केरळ या राज्यांतील जलसाठ्यांमधील पाण्याची पातळी आताच सरासरी २८ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. त्यातही आंध्र प्रदेश (२२ टक्के) आणि कर्नाटक (२९ टक्के) या दोन राज्यांतील स्थिती अधिक गंभीर दिसते. तुलनेने केरळमध्ये गेल्या दहा वर्षांतील ५४ टक्क्यांच्या सरासरीपेक्षा यंदा ४९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तेलंगणमध्येही ही स्थिती सरासरी ५९ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. पुढील दोन महिन्यांत ही स्थिती अधिक गंभीर होणार असल्याने त्याचे परिणाम तेथील नागरिकांना भोगावे लागणार आहेत. या भयावह वास्तवाची झलक बंगळूरुत सध्या पाहावयास मिळते.

त्याच्या दर्शनाने खरे तर सगळ्यांच्याच घशास कोरड पडायला हवी. तथापि याला पाड, त्याला फोड, तिसऱ्याला झोपव, चौथ्याला संपव अशा खेळांत मग्न असलेल्या एकाही राजकीय पक्षास या संकटाच्या गांभीर्याची जाणीव असल्याचे दिसत नाही. त्यात यंदाचा उन्हाळा तीव्र असेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे; म्हणजे पुढील किमान तीन महिने देशातील बहुसंख्य नागरिकांसमोर पाण्याचा प्रश्न ‘आ’ वासून उभा राहणार. जगाची १८ टक्के लोकसंख्या भारतात आहे आणि त्यांना पाण्याच्या केवळ चार टक्के स्रोतावरच अवलंबून राहावे लागते. या स्थितीमुळे भारत हा जगातील पाण्याची टंचाई असणारा देश असेल, असा जागतिक बँकेचा अंदाज आहे. पाण्याच्या अनिर्बंध वापरावर तातडीने कारवाई केली नाही आणि पाण्याचा प्रत्येक थेंब साठवून तो जपूनच वापरण्याची सवय लागली नाही, तर या देशातील अनेक राज्यांसमोर अस्तित्वाचे आव्हानही उभे राहू शकते. नागरीकरणाचा वाढता वेग, वाढती लोकसंख्या आणि पाण्याच्या साठवणुकीची तोकडी व्यवस्था यामुळे गेल्या सात दशकांत देशातील दरडोई पाण्याची उपलब्धता सन १९५१ मधील ५,१७८ किलोलिटरवरून १,४८६ किलोलिटर इतकी कमी झाली आहे. आणखी अडीच दशकांतच ती १,२२८ किलोलिटर इतकी खालावण्याची शक्यता आहे. माणशी किमान १७०० किलोलिटर पाण्याची उपलब्धता असणे आवश्यक असताना भारतात मात्र ती नाही. याचा अर्थ येत्या काही दशकांत पाण्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही, तर नागरिकांच्या अडचणींना पारावार उरणार नाही. हे असे घडते, याचे कारण गेल्या साडेसात दशकांत पाणी हा विषय कोणत्याच पातळीवर महत्त्वाचा मानला गेला नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भाक्रा नानगलसारख्या प्रचंड धरणांची निर्मिती झाली. मग अनेक राज्यांत धरणे उभारली गेली. पाण्याची ही साठवणूक भविष्यातील गरज भागवू शकणार आहे किंवा नाही, याचा विचार मात्र दूरदृष्टीने झाला नाही. त्यामुळेच मागेल त्याला हवे तेवढे पाणी पुरवण्याच्या हव्यासापायी पाण्याची नासाडी होत राहिली. निसर्गदत्त असलेल्या या देणगीचा आपल्या आणि वातावरणाच्या अस्तित्वाशी थेट संबंध आहे, हे लक्षात घेऊन पाण्याबाबत जे नियोजन करायला हवे होते, ते झाले नाही, ही वस्तुस्थिती आता डोळ्यांत पाणी आणणारी ठरते आहे.

पाण्याचे हे वास्तव, त्याच्या वापराच्या प्राधान्यक्रमाशी निगडित आहे. पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगासाठी आणि वीजनिर्मितीसाठी पाण्याचा उपयोग करणे आवश्यक असताना, त्याचा प्राधान्यक्रम दरवर्षी उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यावर अवलंबून ठेवला जातो. याचे कारण वर्षातील केवळ चार महिने या देशात पाऊस पडतो. त्या काळात जमिनीवर पडणारा प्रत्येक थेंब साठवणे, त्याचा सुयोग्य वापर करण्यासाठी जी प्रचंड यंत्रणा उभी करायला हवी, त्याकडे आजवर लक्षच दिले गेले नाही. धरणे बांधली तरी त्यातील सुमारे ४० टक्के पाण्याचे वर्षभराच्या काळात बाष्पीभवन होते. शिवाय, धरणांतील पाणी ठिकठिकाणी पोहोचवण्यासाठी जे कालवे बांधले जातात, त्यातून पाण्याची अमाप चोरी होते. अशा स्थितीत साठवलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या काही देशांत पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा पुनर्वापर करण्यावर भर दिला जातो. भारतात मात्र एकदा उपयोगात आणलेल्या पाण्यापैकी फारच थोड्या, खरे तर नगण्य म्हणता येईल इतक्या कमी पाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापरास योग्य केले जाते. मोठ्या शहरांत दिवसाकाठी जमा होणाऱ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी उपयोगात आणणे सहज शक्य असते. प्रत्यक्षात हे सगळे पाणी तसेच नद्यांमध्ये जाते. त्यामुळे या देशातील नद्याही प्रदूषणाने ग्रस्त. पर्यावरण विभागाच्या आकडेवारीनुसार देशातील ४६ टक्के नद्या प्रदूषित आहेत. त्या नद्यांमधील पाण्याचा कोणत्याही कारणासाठी वापर शक्य नसल्याने, त्या निरुपयोगी ठरण्याचा धोका आहे. देशातील महत्त्वाच्या सुमारे १५० जलसाठ्यांमध्ये आजमितीस केवळ ४० टक्के पाणी उरल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. नद्यांमधील पाण्याच्या स्वच्छतेच्या निर्देशांकाचा विचार केल्यास दिल्लीतील बहुतेक सर्व नद्याही कमालीच्या अस्वच्छ.

आकाशातून पडणारे पाणी जमिनीत झिरपल्याने भूगर्भातील पाणीसाठा वाढत राहतो. गेल्या काही दशकांत हा साठाही झपाट्याने कमी होत चालला आहे. उत्तरेतील चार राज्यांत भूगर्भातील पाणीसाठ्यावर अतिरेकी आक्रमण झाल्याने जलस्रोत मोठ्या प्रमाणावर आटू लागले आहेत. पंजाबमधील ८.७ टक्के जिल्हे, तर राजस्थानातील १२.१ टक्के आणि हरियाणातील १३.६ टक्के जिल्ह्यांतील भूगर्भातील जलसाठा कसाबसा किमान पातळीवर असल्याचे दिसून येते. भूगर्भातील पाणीसाठ्याची अचूक आकडेवारी गोळा करणाऱ्या देशातील ११३८ नियंत्रक स्थानकांपैकी ५६ टक्के स्थानकांकडे या जलसाठ्याची माहितीच उपलब्ध नाही. उत्तरेकडील, जैसलमेर, गुरुग्राम, जयपूर या शहरांमध्ये तर भूगर्भातील जलसाठ्यांवर झालेले अतिक्रमण प्रचंड म्हणावे इतके आहे. अलीकडच्या २०१६ ते २०२३ या काळात देशातील २३४ जिल्ह्यांमध्ये भूगर्भातील पाणी उपसण्याचे प्रमाण मर्यादेपेक्षा अधिक होते. तर ७७ जिल्ह्यांत ते कितीतरी अधिक होते.

एका बाजूला पाण्याची कमतरता, दुसरीकडे भूगर्भातील कमी होत जाणारी पातळी, तिसऱ्या बाजूला पाण्याची नासाडी आणि चौथ्या बाजूला साठवणुकीची अपुरी व्यवस्था अशी चहुबाजूंनी या देशातील पाण्याच्या प्रश्नाला घेरले आहे. शेतीसाठी पुरेसे पाणी मिळत नाही, म्हणून शेतमालाच्या उत्पादनावर होणारे विपरीत परिणाम भोगावे लागत असतानाच, प्रचंड प्रमाणात पाणी पिणाऱ्या उसाची शेती मात्र देशभरात वाढतेच आहे. मागील वर्षी पडलेल्या अपुऱ्या आणि अवकाळी पावसाने यंदाच्या साखर उत्पादनावर परिणाम होईल, असे भाकीत होत असताना, प्रत्यक्षात मात्र उसाच्या क्षेत्रात फार मोठी घट झाली नाही. देशात २०२३ मध्ये ३६० लाख टन साखरेची निर्मिती झाली होती. यंदा ती ३०० लाख टन होईल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र ३४० लाख टन साखर तयार होईल, असे नवे अंदाज आहेत. याचा अर्थ उसासाठी लागणाऱ्या पाण्यात फार मोठी घट झाली नाही. प्राधान्यक्रमात शहरी भागात दरडोई, दरदिवशी १५० लिटर तर ग्रामीण भागात १३५ लिटर पाणी पुरवणे अपेक्षित असताना, शहरांमधील उपलब्ध पाणी दिवसेंदिवस कमी कमी होत चालले आहे. बंगळूरु, चेन्नई यांसारख्या महानगरांच्या यादीत देशातील अन्य शहरेच नव्हे, तर राज्येही समाविष्ट झाली तर आश्चर्य वाटू नये, अशी आजची अवस्था.

# महाराष्ट्राची वाट खडतर; फाटाफुटीने निवडणूक अवघड

लोकसभा निवडणुकांची घोषणा झाली आहे. महाराष्ट्रात पाच टप्प्यातमतदान होणार आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत यावेळची लोकसभा निवडणूक चुरशीची होणार आहे. त्यामुळे राजकारणालाही वेगळीच धार चढली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्याने निवडणुकीत अधिकच रंगत आली आहे. २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना युतीने ४१ जागांवर विजय मिळवला होता. यामध्ये भाजप २३आणि शिवसेनेने १८ जागा जिंकल्या होत्या. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने चार जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसला फक्त एका जागेवर समाधान मानावे लागले होते.

पुढे महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्या. या निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाच्या मुद्द्यावर भाजप आणि शिवसेना यांची युती तुटली. भाजप आणि शिवसेना वेगळे झाले. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आलं. सरकार सत्तेत असतानाच एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केलं. त्यामुळे मविआ सरकार कोसळून राज्यात शिंदे आणि भाजप सरकार आलं. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना हीच खरी शिवसेना असल्याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिला. थोड्याच दिवसानंतर शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुद्धा अजित पवार यांनी बंडाचे निशाण फडकावले. आता अजित पवार भाजपबरोबर सत्तेत आहेत. हा इतिहास सर्वांनाच माहिती आहे. परंतु, या राजकारणाचा परिणाम यावेळच्या लोकसभा निवडणुकांवर होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

कोकण, पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादी-शिवसेना मजबूत दावेदार राज्यातील सध्याच्या राजकीय स्थितीचा आढावा घेतला तर कोकण भागात सहा लोकसभा मतदारसंघ येतात. यामध्ये देशाची आर्थिक राजधानी मुंबई सुद्धा आहे. या भागात वाहतूक आणि दळणवळण आणि रोजगार या प्रमुख समस्या आहेत. राज्यातील सर्वात विकसित क्षेत्रात पश्चिम महाराष्ट्राचा समावेश होतो. या भागात राष्ट्रवादी काँग्रेस आणि




शिवसेना मजबूत दावेदार आहेत. परंतु दोन्ही पक्षात फूट पडल्याने येथील समीकरणे आगामी निवडणुकीत बदलू शकतात. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने येथे पाच जागा जिंकल्या होत्या. तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने प्रत्येकी तीन जागा जिंकल्या होत्या.

उत्तर महाराष्ट्रात कांदा आणि द्राक्षांचे उत्पादन मोठ्या प्रमाणत होते. २०१९ च्या निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेने येथील सर्व सहा जागा जिंकल्या होत्या. आताही परिस्थिती फारशी बदललेली नाही. ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आता शरद पवार गटात आहेत. भाजपने रावेर मतदारसंघात पुन्हा रक्षा खडसे यांनाच उमेदवारी दिली आहे. दुसरीकडे त्यांच्याविरोधात एकनाथ खडसे किंवा रोहिणी खडसे निवडणूक लढणार नाहीत हे देखील स्पष्ट झाले आहे. या भागातील नगर, शिर्डी, धुळे, नंदूरबार आणि नाशिक या मतदारसंघात महायुतीचे खासदार आहेत.

मराठवाडा आणि दुष्काळ हे समीकरण आजही कायम आहे. या भागात पाऊस कमी होत असल्याने राज्यातील अन्य भागांच्या तुलनेत मराठवाड्यातील जिल्ह्यांत विकास कमी झाला आहे. आता याच भागात मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मोठे आंदोलन उभे केले होते. पुढे त्यांचे आंदोलन राज्यभरात पोहचले. येथील धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी, बीड, लातूर, हिंगोली या मतदारसंघातील समीकरणे फाटाफुटीने अधिक कठीण झाली आहेत. धाराशिव मतदारसंघ ठाकरे गटाने चांगला बांधून ठेवला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये वादावादीने आव्हान वाढले आहे.अशोक चव्हाण यांच्या भाजपप्रवेशाने नांदेडातील समीकरणे बदलली आहेत. जालना, बीड येथील परिस्थिती महायुतीला अनुकूल आहे.

विदर्भात शेतकरी आत्महत्यांची परिस्थिती गंभीर आहे. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादाची समस्या आहे. चंद्रपूर जिल्ह्यात मानव वन्यप्राण्यांचा संघर्ष पाहायला मिळतो. मागील निवडणुकीत विदर्भातील ११ जागांपैकी भाजप पाच आणि शिवसेनेने तीन जागा जिंकल्या होत्या. तर काँग्रेस आणि अपक्ष एक- एक जागेवर विजयी झाले होते.

# विद्यार्थीनिंनी सांगली अर्बन बँकेच्या योजनांचा लाभ घ्यावा:सौ.महाजन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा: सांगली अर्बन को-ऑप बँकेच्या अनेक योजना आहेत त्याचा लाभ विद्यार्थीनिनी घ्यावा असे आवाहन उद्योजिका सौ.सुखदा महाजन यानी केले. बँके मार्फत महिलांचा सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी त्या बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ.जे.जे. जोशी या होत्या. येथील कन्या शाळेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते बँकेचे संस्थापक स्वर्गीय आणासाहेब गोडबोले याच्या पुजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक मनिषा सरदेसाई यानी केले. सहा.व्यवस्थापक प्रकाश जोशी यानी बँकेची व बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच मुलींनी बँकेत खाते काढून बँकेशी नाळ जोडावी असे आवाहन केले.यावेळी बँकेच्या वतीने सर्व महिला शिक्षेकेंच्या यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या सौ.सुखदा महाजन म्हणाल्या की मुलींनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर केले पाहिजे, कौशल्य प्राप्त केले पाहिजे.आजकाळ प्रत्येक जण मोबाईलचा वापर करत आहे पण त्याचा योग्य वापर केला पाहिजे. मोबाईल वरून आपण जगाची जोडले जात आहे, यामुळे माहिती आणि तंत्रज्ञान उपल्बध होत आहे याचा उपयोग करून बौध्दिकदृष्ट्या सक्षम होते गरजेचे आहे.

आज डिजिटल बँकीग काळाची गरज आहे .त्यामुळे प्रत्येक मुलीने बँकिंग आत्मसात केले पाहिजे, समजुन घेतले पाहिजे. वेळ असेल आई-वडीला बरोबर जाऊन बँकीचे माहिती घेतली पाहिजे.सांगली अर्बन बँकेत गेले तर सर्व अधिकारी व कर्मचारी तुम्हाला मदत करतील शिवाय तुम्हाला नेहमी माहिती देतील असे सांगितले.त्याच प्रमाणे पुस्तकी ज्ञान व व्यवहार ज्ञान याची सांगड घातली पाहिजे असे सांगितले.

या कार्यक्रमाला सौ.माधुरी साळूंखे, सौ. संगिता नलवडे, सौ.सुप्रिया पाटील, सौ. श्वेता पाटील, कु.प्रियांका डफळे, सौ. अनुजा महाजन,पर्यवेक्षक विजय काळे बँकेचे राहिल पाटील, मयुर वासुलकर, निलम निपूळ इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन बँकेचे सल्लागार सुमंत महाजन, शाखाधिकारी राजेंद्र काटकर, प्रकाश जोशी, विजय काळे यानी केले. सूत्रसंचलन संपदा महाजन यानी केले तर आभार सौ. प्रतिभा पाटील यानी मानले.

# राज्यात लवकरच नवं राजकीय समीकरण

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय समीकरणे दिवसागणिक बदलताना पाहायला मिळत आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीकडून नवीन मित्रपक्षांना सामावून घेण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेना सध्या महायुतीच्या संपर्कात असून लवकरच त्यांचा महायुतीत समावेश होऊ शकतो. यादृष्टीने अत्यंत महत्त्वाची घडामोड घडली असून आज सकाळी राजधानी मुंबईतील ताज लँड हॉटेलमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची बैठक पार पडली.

# कै.सौ.सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळेचा डबल धमाका

## मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा अभियानांतर्गत तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात व्दितीय

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पाटण:महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या अभियानात कै. सौ. सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा, पाटण. या शाळेला तालुक्यात प्रथम तर सातारा जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळाला असून जिल्हा स्तरावरील पाच लाख आणि तालुकास्तरावरील तीन लाख रुपये बक्षीसाची शाळा मानकरी ठरली आहे. शाळेच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र शासन शिक्षण विभागामार्फत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम राबविला जात आहे. तालुकास्तरावरील मुल्यांकन समितीने नुकतीच तालुक्यातील अनेक शाळांची पहाणी केली. शाळेतील उपक्रमशीलता व गुणवत्ता या बाबत मुल्यांकन समितीने मूल्यमापन केले. त्याचा अतिंम




निकाल नुकताच जाहीर झाला. खाजगी व्यवस्थापन गटातून कै. सौ. सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा, पाटण. या शाळेला सातारा जिल्हा स्तरावरील द्वितीय तर तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे. या शाळेचा शिक्षणकार्याचा आजवरचा इतिहास पहाता विद्यार्थीच्या गुणवत्तेला प्राधान्य देऊन त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न केले आहेत. केवळ पुस्तकाच्या माध्यमातून दिलेले शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी पुरेसे नाही ही जाणीव विद्यालयातील प्रत्येक घटकाला आहे. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्याधिपीका, संस्था विद्यार्थीनींच्या सर्वांगीण विकासासाठी शिलेयस्तरावर राबविलेल्या विविध विभागाच्या स्पर्धा, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम इत्यादी शासनाच्या या अभियानाला वरील बाबी बळ देणाऱ्या ठरल्या. असे मुख्याधिपीका सौ. शिलादेवी पाटणकर यांनी सांगितले.

कै. सौ. सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळेच्या व्दिगुणीत यशाबद्दल कोयना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, ज. सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, सहसचिव डॉ. सुहास देशमुख, संचालक संजीव चव्हाण, याज्ञसेन पाटणकर यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# भ्रष्टाचार निर्मूलन समिती स्थापनेबाबत आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सध्या कार्यरत असलेल्या जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या २ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याने नव्याने जिल्हा व तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची स्थापना करावयाची आहे. त्या दृष्टीने जिल्ह्यातील इच्छुकांनी आपले स्वतःचे नाव, पत्ता, वय, शैक्षणिक पात्रता, तसेच कोणत्या गटातून शिफारस करण्यात येत आहे तो गट अथवा प्रवर्ग या सर्व आवश्यक कागदपत्रांसह २२ मार्चपर्यंत अर्ज सादर करावेत.

सदर अर्जाचा नमुना प्रत्येक तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. इच्छुकांनी भरलेले परिपूर्ण अर्ज sgysangligmail.com या ईमेलवर पाठवावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नसल्याचे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# वैशिष्ट्यपूर्ण वटवाघळे

वटवाघळे हे पक्षी नाहीत; तर उडणारे, उंची गाठणारे सस्तन प्राणी आहेत. सर्व वटवाघळे निशाचर असतात, असा पूर्वी समज होता. जगभर वटवाघळांना अशुभ, मृत्युसंकेत देणारे मानले जात असे. वटवाघळे पृथ्वीवर पाच कोटी वर्षांपूर्वी अवतरली. त्यांच्या निदान चौदाशे जाती आज ज्ञात आहेत. सस्तन प्राण्यांच्या पाच हजार चारशे हयात जातींमध्ये केवळ वटवाघळांच्याच २६ टक्के जाती आहेत. वटवाघळांत जातिसंख्येप्रमाणेच, अधिवासापासून अनेक बाबतीत प्रचंड जैवविविधता आहे.

वटवाघळे लहानमोठ्या गुहा, झाडांच्या ढोली, पुलांच्या कमानी, ओसाड वाडे-विहिरींत शेकडो ते लाखो अशा समुदायाने राहतात. काही एकांडीही राहतात. वटवाघळांच्या बहुसंख्य जाती कीटकाहारी, थोड्या शाकाहारी, क्वचित काही उंदीर-बेडूक खाणाऱ्या असतात. केवळ रक्त पिऊन जगणाऱ्या मात्र तीनच जाती मध्य आणि दक्षिण अमेरिकेत आहेत. काही वटवाघळे कायम एकाच ठिकाणी राहणारी, काही थोडेफार स्थलांतर करणारी आणि अन्य काही शेकडो किलोमीटर स्थलांतर करणारी असतात. उड्डाणक्षमतेमुळे वटवाघळे त्रिमित अवकाशात वावरतात. एका देशातून दुसऱ्यात, क्वचित एका खंडातून दुसऱ्या खंडातही जातात. त्यामुळे भूसंचारी प्राण्यांपेक्षा वटवाघळे रोगजंतूवहन जलद, दूरवर करतात.

नर-मादी मिलनानंतर काही जातींच्या वटवाघळांत लगेच गर्भधारणा होते; तर काही जातींमध्ये मादी शुक्राणू शरीरात साठवून काही आठवड्यांनी गर्भधारणेसाठी वापरते. रात्रसंचारी वटवाघळे उच्च कंपतेच्या, माणसांना ऐकू न येणाऱ्या ध्वनिलहरी प्रक्षेपित करतात. आसपासच्या वस्तूंवर आपटून ध्वनिलहरींना परतायला किती वेळ लागतो, यावरून वस्तू किती दूर आहेत ते त्यांना समजते. परावर्तन कोनांवरून दिशा कळते. त्यामुळे मिट्ट काळोखातही वटवाघळे न अडखळता संचार, शिकार करू शकतात. वटवाघळांची विष्ठा-ग्वानो खत ठरते. काही वटवाघळे स्वतःच्या वजनाच्या पन्नास टक्के वजनाचे कीटक रोज खातात. त्यामुळे कीटकांचे नियंत्रण होते. वटवाघळे स्वतःच्या नकळत परागकणांचा, बियांचा विषाणू-जीवाणूंसारख्या रोगकारकांचा प्रसार करतात. पण वटवाघळांची संशोधकांना सर्वांत आकर्षक वाटणारी वैशिष्ट्ये म्हणजे डझनावारी प्रकारचे घातक विषाणू अंगात बाळगूनही त्यांना सहसा विषाणूरोग होत नाही. कर्करोग होत नाही आणि ती दीर्घायुषी असतात. या वैशिष्ट्यांचा अभ्यास माणसांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

# मतदानाचा हक्क बजावणे हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य:अतुल म्हेत्रे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कराड: मतदानाचा हक्क बजावणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाची कर्तव्य आहे. यावर आपली लोकशाही अवलंबून आहे. सातारा जिल्ह्यामध्ये कराड दक्षिण मतदार संघात सर्वात जास्त नव तरुण मतदारांनी नाव नोंदणी केलेली आहे. मतदान करून देशाच्या विकासासाठी सर्वांनी हातभार लावावा व इतरांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे असे आवाहन अतुल म्हेत्रे यांनी मतदान जनजागृती कार्यक्रमात केले.

कराड येथील रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, व क्रीडा विभाग तसेच स्वीप सातारा लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जिल्हाधिकारी कार्यालय सातारा व तहसीलदार कार्यालय कराड यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती अभियान



**कराड:सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियानात बोलताना प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे,व्यासपीठावर कराडचे तहसीलदार विजय पवार, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने आदी मान्यवर.**

कार्यक्रम बुधवार दिनांक २०/०३/२०२४ रोजी महाविद्यालय संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी कराडचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हेत्रेसाहेब, कराडचे तहसीलदार विजय पवार व तहसीलदार कार्यालयातील विविध पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी स्वीपच्या समन्वयक लोंढे मॅडम व पवार मॅडम ही उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी करून दिला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नेताजी सूर्यवंशी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अभय पाटील, प्रा. डॉ.अनंत धोंडमणी, प्रा. डॉ. विद्या पाटील यांनी या कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिस्तबद्ध नियोजन केले होते. कार्यक्रमाचे आभार भोसले सर यांनी मांणले याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# रेणावी घाटातील अपघात प्रकरणी डंपर चालकास दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

विटा: आटपाडी आगाराच्या बसला पाठिमागून धडक देऊन काही प्रवाशी व जखमी मृत्यू केल्याप्रकरणी न्यायालयाने डंपर चालक कारणीभूत ठरल्याने डंपर चालक सागर तानाजी चौगुले(वय वर्ष २६रा मणेराजुरी.ता. तासगाव) यास आज प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी दोन वर्षे सक्त मजुरी शिक्षा व१५हजार रुपये दंड दंड न भरल्यास ३महिने साधी कैद विविध कलमांतर्गत तीन ; सहा .तीन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावल्याचे विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद मेमाणे साहेब यांनी दैनिक प्रीतिसंगम प्रतिनिधी शिराज शिकलगार यांना सांगितले.

सविस्तर माहिती अशी की. २४ एप्रिल २०१८रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास सागर चौगुले याने डंपर (एम.एच. १०. ए. डब्ल्यू. २७६७). रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे भरधाव डंपर चालवून रेना विचार मुरलीधर धोंडीराम यादव यांच्या जमिनीच्या उत्तरेस रेणावी खानापूर रस्त्यावर घाटाच्या पहिल्या वळणावर समोरून येणाऱ्या आटपाडी आगाराच्या बस क्रमांक (एम.एच.१२/ सी एस. ७६७०/ चालकाच्या मागील बाजूस धडक दिली. या मध्ये गंभीर तानाजी विलास जाधव. ( वय वर्षे ४५भडकेवाडी. ता. खानापूर). सुनंदा उत्तम यादव (वय वर्ष ४७ वाटंबरे तालुका सांगोला .जिल्हा सोलापूर.) . विजय जालिंदर कुंभार.(वय वर्षे ४६ खानापूर.ता.खानापूर). यांचा मृत्यू झाला होता. तर सत्वशिला श्रीरंग ढाणे (वय वर्ष ५७ ) दत्त सुनील ढाणे (वय वर्ष ४ तिघेही रा. ढाणेवाडी ता कडेगाव). शालीनी शांताराम हेलवडे. (वय वर्षे १९ रा गोवलकोटा जिल्हा रत्नागिरी). हे जखमी झाले होते. या संदर्भात आटपाडी आगार डेपो चे बस चालक उमेश रामचंद्र जाधव (पाथरेवाडी. ता.आटपाडी). यांनी विटा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. डंपर चालक सागर चौगुले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. असे विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद मेमाणे साहेब यांनी सांगितले तपासी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक आर. सी. पिसाळ. पोलीस एन.एस.देवकते. पी.एस. कुंभार. आर एन.महाडिक; तर सरकारतर्फे ॲड. व्हि. एस. कोकाटे. एस.एस.गायकवाड. एम आर भादुर्गे .यांनी काम पाहिले.

# वाई, खंडाळा आणि महाबळेश्वर तालुक्यात आचारसंहितेचा भंग होवू नये म्हणून करडी नजर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

वाई: लोकसभा सार्वत्रीक निवडणुक २०२४ च्या संचलना करीता वाईच्या प्रांताधिकारी कार्यालयात मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची ऊभारणी करण्यात आली आहे. या कक्षात वाई खंडाळा महाबळेश्वर या ३ तालुक्यातील निवडणुकीचे काम पाहणार्या विविध अत्यावश्यक पथकांची अतिशय देखणी आणी प्रसंन्नता लाभणारी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. .या ठिकाणी पथकांन साठी लागणारी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. या नियंत्रण कक्षातुन ३ हि तालुक्यातील शहरांनसह गावोगावी सुरु असलेल्या आदर्श आचारसंहितेचा सर्वच राजकीय पक्षांचे लोक प्रतिनिधी व कार्यकर्त्यांन कडुन भंग होतो आहे का? या वर करडी नजर ठेवण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र जाधव यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

कक्षातील सर्व कामकाज वाईच्या तहसीलदार सोनाली मेटकरी यांच्या देखरेखी खाली चालणार आहे. बोलताना राजेंद्र जाधव पुढे म्हणाले या नियंत्रण कक्षात लोकप्रतिनिधी आणी कार्यकर्त्यांना निवडणूक काळात अनेक खात्यांन कडील प्रचारासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या परवानग्या सर्व शासकीय कार्यालयांचे ऊंबरठ्यावर जावे लागु नये व त्या तातडीने विना विलंब मिळाव्यात या साठी एक खिडकी योजनेचे आयोजन करण्यात आले आहे .या कक्षा मध्ये नगरपरिषद पंचायत समिती आरटीओ पोलिस स्टेशन इत्यादी विभागांच्या अधिकारी आणी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच या मध्यवर्ती कक्षामध्ये आदर्श आचारसंहितेची बिनचुक अंमलबजावणी करण्या साठी वाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांच्या देखरेखी खाली स्वतंत्र पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. या पथकांन मार्फत वाई महाबळेश्वर खंडाळा या वाई विधानसभा मतदार संघा मध्ये आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या संचलना करीता मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची सुसज्ज अशी ऊभारणी करण्यात आली आहे. वाईतील प्रांताधिकारी कार्यालयात असणाऱ्या पार्किंग झोनमध्ये हे कक्ष उभारले आहे. त्यात एक खिडकी योजना विभाग. खर्च नियंत्रण विभाग आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी विभाग. निवडणुक विषयांच्या विषयी येणार्या ऑनलाईन तक्रारींची गंभीर दखल घेवुन त्याची खात्री करून तात्काळ कारवाई आणी निपटारा करणे विभाग .तसेच टिव्हीवर येणार्या आक्षेपार्ह बातम्यांनवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र विभाग .सर्वच राजकीय पक्षांच्या लोक प्रतिनिधींच्या प्रचारासाठी होणार्या सभांनवर नियंत्रण आणी देखरेख ठेवण्या साठी पथके सज्ज ठेवली आहेत. हा एक स्वतंत्र विभाग आहे .वरील सर्व शासकीय यंत्रणा निवडणुक आयोगाने दिलेल्या सूचनांचे बिनचुक पालन करत हि लोकसभेची निवडणूकीचे काम काज पार पाडणार आहे. निवडणूक कक्षात नेमण्यात आलेल्या कुठल्याही अधिकारी अथवा कर्मचारी यांच्या कडुन कामकाज करताना गैरवर्तन करताना आढळून आल्यास त्यांच्या वरही कठोर कारवाई करणार असल्याची माहिती दिली.

सध्या आदर्श आचारसंहितेचा कालावधी सुरु आहे या कालावधीत कुठल्याही राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधी अथवा कार्यकर्त्यांन कडुन आदर्श आचारसंहितेचा भंग होवु नये यावर करडी नजर मि स्वता ठेवणार आहे. आचारसंहितेचा भंग झाल्यास तात्काळ गुन्हे दाखल करण्यास मि व माझी यंत्रणा कशाचीही पर्वा करणार नाही अशीही माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र जाधव यांनी दिली आहे.

# भावगंधर्वांनी जागवल्या लतादीदींच्या स्वरमयी आठवणी

## गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या स्मरणार्थ विभावरी आपटे-जोशी यांना 'दीदी पुरस्कार' प्रदान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: लतादीदीचा मी बाळ होतो. शेवटपर्यंत तिने माझी काळजी घेतली. तिच्या कंठात साक्षात ईश्वराचा अंश होता. वयाच्या पाचव्या वर्षापासून ती बाबांच्या सानिध्यात गात होती. विविध भाषांतील लहेजा, शब्द समजून घेत ती सर्व प्रकारची गाणी गायची. तिने गायलेली सर्वच गाणी अजरामर झालेली आहेत. तिच्यात संवेदनशीलपणा होता. सामाजिक जाणीव होती. लतादीदीच्या जाण्याने संगीत सागरातील एक हिमनग कोसळला आहे. दोन वर्षांनंतरही मी पूर्णपणे सावरलेलो नाही, अशा शब्दांत लतादीदींचे बंधू भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी आपल्या बहिणीविषयीच्या आठवणी जागवल्या.

गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त मंगेशकर कुटुंबियांच्या वतीने संगीत क्षेत्रातील सेवेबद्दल दिला जाणारा 'दीदी




पुरस्कार' ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर व दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर यांच्या हस्ते गायिका विभावरी आपटे-जोशी यांना प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर, प्रसिद्ध गायक राहुल देशपांडे, भारती मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, संयोजन समिती सदस्य व गायिका मनीषा निश्चल, निश्चल लताड आदी उपस्थित होते.

यावेळी सादर झालेल्या 'विश्वमोहिनी लता दीदी' या सांगीतिक मैफलीने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्यासह गायक राहुल देशपांडे, गायिका विभावरी आपटे-जोशी, मनीषा निश्चल, प्राची देवल, गायक श्रेयस बेडेकर यांनी लतादीदींची अजरामर गाणी सुरेल पद्धतीने सादर केली.

श्रीरामचंद्र कृपाळू भजमन या गीताने मैफलीची सुरुवात झाली. त्यांनतर लग जा गले... एक प्यार का नगमा है... रुक जा रात ठहर जा रे चंदा... आज कल पाव जमी पर पडते नहीं मेरे... अखेरचा हा तुला दंडवत... तू तेव्हा तशी... ये दिल और उनकी निगाहो के साये... अशा अजरामर गीतांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. श्रोत्यांमधून प्रत्येक गाण्यानंतर 'वन्स मोअर'ची दाद मिळत होती.

मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याविषयी हृदयनाथ मंगेशकरांनी लिहिलेल्या आठवणींचे वाचन करत मास्टरजींच्या काही चीजा सादर केल्या. तसेच मंगेशकर आणि देशपांडे कुटुंबियातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. लतादीदींची काही गाणी व त्यातील बारकावे, त्यावेळचे किस्से मंगेशकर यांनी सांगितले.

रवींद्र खरे यांचे ओघवते निवेदन, सिंथेसायझरवर विवेक परांजपे व अमृता ठाकूरदेसाई, तबल्यावर डॉ. राजेंद्र दूरकर व विशाल गंड्रतवार, बासरीवर निलेश देशपांडे, सतारीवर प्रसाद गोंदकर, ऑक्टोपॅडवर ऋतुराज कोरे, गिटारवर विशाल थेलकर यांनी साथसंगत केली.

# उदयनराजे यांच्या दिल्ली दौऱ्याकडे 'राजे' समर्थकांचे लक्ष

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



साताराः खासदार उदयनराजे भोसले हे सातारा लोकसभेसाठी तिकीट मिळावे यासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत त्यासाठी ते दिल्लीत दाखल झाले आहेत . केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व उदयनराज`यांच्यामध्ये शुक्रवारी सकाळी चर्चा होणार असल्याने राजे समर्थकांचे आणि समस्त सातारकरांचे या बैठकीकडे लक्ष लागून राहिले आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सातारा व माढा लोकसभा मतदारसंघाचा राजकीय पेच प्रचंड वाढला आहे माढ्यातून विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी भाजपचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे फलटणच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात पुन्हा एकदा रामराजे यांनी पुन्हा एकदा विरोधाचा सूर आळवला . त्यामुळे भर सभेत कार्यकर्त्यांनी तुतारी हातात घेण्याचे आवाहन रामराजे यांना केले आहे . दुसरीकडे भाजपच्या पक्षश्रेष्टींनी रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचीच उमेदवारी राहील असे स्पष्ट केल्याच्या चर्चा सुरू झाल्यामुळे माढ्याची जागा भाजपसाठी राहते की जाती अशी अवस्था आहे

भाजपने लोकसभा निवडणुकांच्या तीन याद्या आतापर्यंत जाहीर केल्या त्यामध्ये खासदार उदयनराजे भोसले यांचे कुठेच नाव नाही त्यामुळे राजे समर्थकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे सातारा जिल्ह्यातील भाजप कार्यकारिणीचे नेते सुद्धा या विषयावर सावधपणे बोलताना दिसत आहेत त्यामुळे पक्षश्रेष्टींकडूनच सर्व अंतिम निर्णय करून घेण्यासाठी उदयनराजे यांनी दिल्लीमध्ये तळ दिला आहे उदयनराजे गुरुवारी दिवसभर संसद भवनाच्या परिसरामध्ये वास्तव्य करून होते . केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर शुक्रवारी सकाळी त्यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे या बैठकीमध्ये उदयनराजे यांच्या उमेदवारी संदर्भात चर्चा होणार असल्याच्या बातम्या समोर येत असून नक्की गोपनीय चर्चा काय होणार उदयनराजे यांना तिकीट मिळणार का या सर्व प्रश्नांची उत्तरे उद्याच्या होणाऱ्या बैठकीत मिळणार आहेत त्यामुळे या बैठकीला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे

दरम्यान उदयनराजे दिल्लीला रवाना झाल्यानंतर आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले हे सुद्धा गुरुवारी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यासाठी सागर बंगल्यावर दाखल झाले. त्यावेळी त्यांच्या समवेत मोजकेच कार्यकर्ते उपस्थित होते साताऱ्याची जागा भाजपसाठी सुटावी आणि पक्ष जो उमेदवार देईल त्याचा आम्ही मनापासून प्रचार करू अशी सरळ भूमिका शिवेंद्रसिंह राजे यांनी घेतली आहे सातारा विधानसभा मतदारसंघात शिवेंद्र सिंह राजे यांचे एक हाती वर्चस्व आहे त्यामुळे सातारा लोकसभेच्या उमेदवाराच्या निर्णायक मताधिक्यामध्ये शिवेंद्रसिंहराजे यांची मोठी भूमिका राहणार आहे परिणामी फडणवीस आणि शिवेंद्रसिंहराजे यांच्यातील गुप्त खलबत्तांना महत्त्व प्राप्त झाले या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर वीस मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे या चर्चेचा तपशील मात्र समजू शकलेला नाही.

# सातारा जिल्ह्यात मविआच्या मताधिक्यासाठी विचार विनिमय

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



राष्ट्रवादी काँग्रेस भवन मध्ये साताऱ्यात महाविकास आघाडीच्या घटक पक्षासोबत झालेली चर्चा

साताराःलोकसभा निवडणुकीची रणनीती दिवसेंदिवस बदलत आहे .महाविकास आघाडीने मात्र सातारा जिल्ह्यात रणनीती ठरवण्यामध्ये आघाडी घेतलेली आहे. राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना म्हणजे खऱ्या अर्थाने माणुसकी केंद्रबिंदू मानून मतदारांना मतदान करण्यासाठी प्रमुख कार्यकर्ते स्वयंपूर्ण यशस्वी विचार विनिमय करीत आहेत. आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस भवन मध्ये लोकशाहीला साजेस अशा पद्धतीने चर्चा करण्यात आली. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, किसनवीर आबा, बाळासाहेब देसाई असा वारसा लाभलेल्या काँग्रेस व राष्ट्रवादी त्याचबरोबर मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी लढणारे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आज खऱ्या अर्थाने युगपुरुषांच्या विचारांची रंगपंचमी सुरू झालेली आहे. सर्वधर्मसमभावाचा नारा देऊन सातारा व माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मताधिक्याने निवडून आणण्याची ग्वाही सर्वच प्रमुख पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे. कोणत्याही प्रकारचे मतभेद नाहीत.

प्रचारात चांगल्या पद्धतीने स्टार्टअप घेतल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागलेली आहे. त्यांना अद्यापही उमेदवार निश्चित करता येत नाही. विरोधकांनी इतर पक्षातून कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात घेतले . आता त्यांची मनधरणी करताना त्यांच्या नेत्यांच्या तोंडाला फेस येत आहे. हाच मोठा महाविकास आघाडीचा विजय आहे. विचाराची लढाई विचाराने केली जाते. त्यामध्ये निश्चितच यश मळते. आज सामाजिक कार्यकर्त्यांनाही महायुतीच्या सत्तेतून आलेला अनुभव व सामान्य माणसांची झालेली फरफट याबाबत आता मतपेटीतूनच मतदारांनी जाब विचारायचं आहे. सध्या महाविकास आघाडीची तयारी पूर्ण झाली असून पुन्हा एकदा बैठक होऊन सातारा व माढा लोकसभा मतदार संघातील प्रचाराच्या शुभारंभ करण्यात येणार आहे. महा विकास आघाडी सोबत अनेक घटक पक्ष सामील होत आहेत. कारण, ही लढाई म्हणजे धनशाही विरुद्ध लोकशाही असून संविधान वाचवण्यासाठी सर्वांनी आता आत्मीयतेने प्रचार यंत्रणा राबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. याचे सर्वत्र स्वागत होत आहे. सातारा जिल्ह्यातील लोकसभेचा निकाल हा महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला दिशादर्शक ठरणार आहे. अशा शब्दात मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सामाजिक कार्यकर्ते नेहमीच रस्त्यावर उतरतात. त्यांनी गेली पाच वर्षे महायुतीला जाब विचारला आहे. आता त्यांना काँग्रेस व राष्ट्रवादी असे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय मांडके यांनी स्पष्ट केले.

# कुणालाही उमेदवारी द्या पण माढ्याचा उमेदवार बदला

## रामराजे नाईक निंबाळकर:कार्यकर्त्यांच्या भवाना लक्षात घेवून चार दिवसांनी निर्णय जाहिर करणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



फलटणः- कुणालाही उमेदवारी द्या पण आत्ताचा उमेदवार बदला असे जाहीर आवाहन रामराजे नाईक निंबाळकर यांनी महायुतीला केले आहे.जर रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना मतदान कमी झाले तर आम्ही जबाबदार राहणार नाही असेही रामराजे यांनी सांगितले,ते फलटण येथे जाहीर मेळाव्यात बोलत होते.

माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपने रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी दिल्यामुळे निर्माण झालेली नाराजी अद्याप कमी होताना दिसत नाही. अशातच आता विधानपरिषदेचे माजी सभापती श्रीमंत रामराजे निंबाळकर यांनी माढा लोकसभेत रणजितसिंह निंबाळकर यांच्यासाठी कोणतेही योगदान देण्यास स्पष्टपणे नकार दिला आहेत. रामराजे निंबाळकर यांनी काल गुरुवारी फलटण येथे अनंत मंगल कार्यालयात जाहीर मेळावाचे आयोजन केले होते.त्यावेळी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांशी जाहीर संवाद साधला. यावेळी त्यांनी माढ्यातील एक खासदार पडला तर दिल्लीतील लोकांना काय फरक पडतोय, असे वक्तव्य करुन एकच खळबळ उडवून दिली आहे.

देवेंद्र फडणवीस आणि माझे अतिशय उत्कृष्ट संबंध आहेत. मी माढ्याबाबत त्यांना बैठकीत स्पष्टपणे सांगितले होते की, साहेब हे असे होणार आहे. हा उफाळून येणारा मतप्रवाह फलटणपुरता मर्यादित राहील, असे मला वाटत नाही. त्यावर देवेंद्र फडणवीस मला म्हणाले की, रामराजे युतीधर्म आहे. तर अजितदादा यांनीही रामराजे, तुम्ही कार्यकर्त्यांशी बोला, त्यांन शांत करा, असे सांगितल्याचे रामराजे यांनी बोलताना आपल्या भाषणात सांगितले.

आपण सर्वजण राजकारण करीत असताना भावनेच्या घरामध्ये राजकारण करून चालणार नाही. भावनेच्या भरात तुतारी किंवा मशाल घेऊ; असे म्हणून आपल्याला चालणार नाही. भावना विरहित राजकारण करणे गरजेचे आहे. आता असलेली निवडणुकी शेवटची निवडणूक नाही; त्यामुळे सर्वांनी थोड सबुरीने घेणे आवश्यक आहे. महायुतीच्या आत्ता जाहीर झालेल्या उमेदवाराच्या समवेत आपण एका स्टेजवर बसू शकत नाही. संजीवराजे यांना माढा लोकसभेची उमेदवारी मिळावी अशी तुमच्यासह आमची सुद्धा इच्छा होती. आमची इच्छा मी आमच्या पक्षाकडे व्यक्त केलेली होती; असेही यावेळी श्रीमंत रामराजे म्हणाले.

यावेळी बोलताना श्रीमंत रामराजे म्हणाले की; आम्ही तिकिटासाठी कधीही दिल्लीला गेलेलो नाही. फलटण तालुक्यामध्ये यापूर्वी सुद्धा विरोधक होते त्यामध्ये हणमंतराव यांचा गट असेल; चिमणराव यांचा किंवा अगदी कृष्णचंद्र भोईटे व हिंदुराव यांचा गट होता राजकारणामध्ये विरोध करण्याशिवाय आम्ही इतर कुठेही विरोध केलेला नाही. सर्व कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेत आगामी चार दिवसांमध्ये निर्णय जाहीर करणार आहे. आत्ता असलेले तालुका प्रशासन म्हणजे यांच्या घरातील कामगार असल्यासारखे वागत आहे.प्रशासन यांच्या हाताखाली काम करत आहे. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्याला अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागत आहे. मुद्दामून आमच्या कार्यकर्त्यांना व्यक्तिगतरीत्या टार्गेट करण्याचे काम करीत आहेत. माण तालुक्याचे आमदार तर स्वतः जिल्हा चालवत असल्याच्या अविर्भावामध्ये वावरत असतात. अशा माणसाच्या हातामध्ये जर जिल्हा गेला तर जिल्ह्याची काय अवस्था होईल ? असा प्रश्न सुद्धा यावेळी श्रीमंत रामराजे यांनी उपस्थित केला.

यावेळी श्रीमंत रामराजे म्हणाले की; खासदार रणजितसिंह व आमची काही घरची भांडणे नाहीत. आमची सुद्धा राजकीयच वैर आहे. आगामी काही दिवसांमध्ये आपण आपली भूमिका जाहीर करणार आहोत. उमेदवार बदलण्यासाठी आपण एक शिष्टमंडळ घेऊन सर्वांना भेटणार आहोत. सातारा जिल्ह्याला इतिहास आहे. एक राजकीय संस्कृती आहे. आपली राजकीय संस्कृती आपण विसरत आहे. दोन नंबरचे धंद्यांना सुरक्षित करण्याचे काम हे विद्यमान खासदार करीत आहेत. यांना भारतीय जनता पार्टीची संस्कृती माहीत नाही. हे पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे आहेत. माढा लोकसभा मतदारसंघाबाबत बोलताना रामराजे निंबाळकर यांनी म्हटले की, आज फक्त फलटणचा प्रश्न नाही. तर खटाव आणि माणचाही प्रश्न आहे. आता मी ठराविक लोक घेऊन अजितदादांना जाऊन भेटणार आहे. त्यांना स्पष्टपणे सांगणार आहे की, भाजपला इतक्या विरोधानंतरही उमेदवार कायम ठेवायचा असेल तर मतदान कमी झालं म्हणून आम्ही जबाबदार राहणार नाही. हे आपण अजितदादांना स्पष्टपणे सांगून येणार. मग तुम्हाला करायचे ते करा. शेवटी देशभरात एकूण ५४२ खासदार आहेत. एखादा-दुसऱ्या खासदाराचं दिल्लीला काय पडलंय? पण यांना वाटतं की, आपण म्हणजे फार मोठे खासदार आहोत. यांच्याबद्दल काय बोलावं आणि किती बोलावं? त्यांच्याबद्दल बोलून आता मला कंटाळा आला आहे, असे सांगत रामराजे निंबाळकर यांनी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना टोला लगावला. या सभेत रामराजे निंबाळकर यांनी नीरा-देवघर प्रकल्पाबाबत भाष्य केले. मी नीरा-देवघर पुनर्वसनाबाबत रात्री तीन-तीन वाजेपर्यंत बैठका घेतल्या म्हणून ६६ किलोमीटर लांब खंडाळ्यापर्यंत पाणी आले. २०१४ साली तांत्रिक कारणामुळे कालव्याच्या दुरुस्तीचे टेंडर निघू शकले नव्हते, ही कोणाची चूक आहे, असा सवाल रामराजे निंबाळकर यांनी उपस्थित केला.

# वनांच्या, पर्यावरणाच्या रक्षणात प्रत्येकाचा सहभाग आवश्यक : जे.पी.त्रिपाठी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : वनांचे संरक्षण झाले तरच भविष्यात आपल्याला हवा, पाणी व अन्न यासंबंधीच्या गरजा पूर्ण होणार आहेत. सध्या नैसर्गिक संसाधनांवर कमालीचा ताण पडत असून, स्थानिकांच्या सहभागानेच आपण वनांचे रक्षण व वनसंपदेत वाढ करून पर्यावरणीय प्रश्नांची सोडवणूक करू शकतो. त्यासाठी प्रत्येकाचा सहभाग व योगदान आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुंडल वन प्रबोधिनीचे महासंचालक जे. पी. त्रिपाठी यांनी केले.

जागतिक वन दिनानिमित्त कुंडल वन प्रबोधिनी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्य वनसंरक्षक मदन कुलकर्णी व प्रबोधिनीचे संचालक डॉ. शैलेंद्रकुमार जाधव उपस्थित होते.



**सांगली : जागतिक वन दिनानिमित्त कुंडल वन प्रबोधिनी येथे वृक्षारोपण करताना उपस्थित अधिकारी**

संचालक डॉ. शैलेंद्रकुमार जाधव यांनी जागतिक वन दिवस साजरा करण्यामागची भूमिका विशद केली. संयुक्त राष्ट्रसंघाने दि. २८ नोव्हेंबर २०१२ ला आंतरराष्ट्रीय वन दिन साजरा करण्याचा ठराव मंजूर केल्यानंतर, वनांचा मानवी जीवनाशी असलेला सरळ संबंध, जंगलावर अवलंबून असणारी प्राचीन औषध प्रणाली आणि सोबतच जंगलावर आपली उपजीविका भागवणाऱ्या जमाती आणि जैवविविधता याबाबत लोकांमध्ये जागरुकता पसरवण्यासाठी आणि जंगल निर्माण, संवर्धन आणि संरक्षणाच्या उद्देशांसाठी २१ मार्च २०१३ पासून आंतरराष्ट्रीय वन दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो.

वन विषयक आपले ज्ञान अद्यावत करून,नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून वनसंपदेत वाढ करणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण करणे, प्रत्येक परिसंस्थेचे, जैवविविधतेचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मदन कुलकर्णी यांनी संगितले. यावेळी प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकारी कु. निशी साहू, दुर्गेश पांडे, अमित सिंग चंडेल यांनीही समयोचित विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रामदास पुजारी यांनी केले.

या प्रसंगी सेवानिवृत्त सहायक वनसंरक्षक रामदास पुजारी व दत्तात्रय शेटे, वनक्षेत्रपाल चैतन्य कांबळे व गायत्री वसावे, व्याख्याते सी.ए. कुलकर्णी तसेच वनक्षेत्रपाल प्रशिक्षण सत्र ११ मधील व मध्यप्रदेश राज्यातील ३७ प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# विविध उपक्रमाव्दारे मतदार जनजागृती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिका क्षेत्रात स्वीप उपक्रमांतर्गत विविध उपक्रमाव्दारे मतदार जनजागृती करण्यात येत आहे. भारती मेडिकल कॉलेज व नर्सिंग कॉलेज सांगली, नेमिनाथनगर मैदान सांगली, शांतिनिकेतन महाविद्यालय, वॉलचंद कॉलेज सांगली या ठिकाणी विविध उपक्रमाव्दारे मतदार जनजागृती करण्यात आली.

भारती मेडिकल कॉलेज व नर्सिंग कॉलेज सांगली येथे व्होटर (voter) हेल्पलाईन या पव्दारे मतदार नोंदणी करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. नेमिनाथनगर येथे मतदार जनजागृतीचे स्टॉल लावून त्या ठिकाणी युवा मतदारांची नोंदणी, मतदार यादीतील नावे तपासणे, तसेच नवीन मतदार नोंदणीसाठी युवकांना प्रोत्साहित केल व नवीन मतदार नोंदणी व दुरूस्ती साठी असणाऱ्या फॉर्म चे वाटप केले. शांतिनिकेतन महाविद्यालय व वॉलचंद कॉलेज सांगली येथे चित्रकला स्पर्धा आयोजित करून मतदार जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील, महापालिका क्षेत्राचे स्वीप नोडल अधिकारी तथा मनपा उपायुक्त वैभव साबळे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी यांची उपस्थिती होती.




**सांगली : येथे स्वीप उपक्रमांतर्गत मतदार जनजागृती करण्यात येत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे जनजागृती करताना**

# ‘निर्भया’ ला मिळाला न्याय, नराधमाला फाशीची शिक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : मावळ तालुक्यातील कोथुर्णे गावातील अवघ्या साडेसहा वर्षांच्या मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार करत तिचा निर्घृण खून केल्याप्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा ठोठावली. पुण्याच्या विशेष न्यायालयाने शुक्रवारी (दि. २२) या गंभीर गुन्ह्यात नराधमाला फाशीची शिक्षा सुनावत ‘निर्भया’ला खऱ्या अर्थाने न्याय दिला. तर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीच्या आईला सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली.

आरोपीला काय शिक्षा होणार, फाशी की जन्मठेप? याकडे शुक्रवारी न्यायालयात हजर असलेले पीडितेचे वडील आणि गावकऱ्यांचे लक्ष लागले होते. शिक्षा सुनावण्यापूर्वी न्यायालयाने आरोपीचे म्हणणे ऐकून घेतले. पण त्याच्या चेहऱ्यावर पश्चातापाचा लवलेशही नव्हता. मी हा गुन्हा केलाच नाही, असे चोवीस वर्षीय आरोपी सांगत होता. न्यायालयाने त्याला गुन्हा सिद्ध झाल्याचे सांगत

राज्याला हादरवून टाकणाऱ्या या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेत विशेष न्यायाधीश बी. पी. क्षीरसागर यांनी हा निकाल दिला. तेजस उर्फ दादा महिपती दळवी (वय २४) असे फाशी झालेल्या नराधमाचे नाव आहे, तर सुजाता महिपती दळवी (वय ४८, दोघेही रा. कोथुर्णे, पवननानगर, मावळ) असे त्याच्या आईचे नाव आहे. याबाबत चिमुकलीच्या वडिलांनी कामशेत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

ही धक्कादायक घटना २ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी घडली होती. त्या दिवशी नागपंचमीच्या निमित्ताने शाळेला सुटी असल्याने चिमुकली घरासमोर खेळत होती. अचानक ती बेपत्ता झाल्याने गावात शोधाशोध सुरु झाली. पोलिसांनी गावात शोधमोहिम राबविली. दुसऱ्या दिवशी (३ ऑगस्ट) दुपारच्या सुमारास गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मागे झुडुपात या मुलीचा मृतदेह आढळला. तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या केल्याचा घृणास्पद प्रकार समोर आला. पोलिसांनी तपासाची सूत्रे फिरवित चोवीस तासांच्या आत चिमुकलीच्या शेजारी राहणाऱ्या तेजस दळवीला अटक केली. पोलिसांच्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याविरोधात कलम ३६३, ३७६, ३७६ ए, ३७६ एबी, ३०२ आणि लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्याच्या (पोक्सो) कलम चार व पाचनुसार गुन्हा सिद्ध झाला. पोलिस निरीक्षक संजय जगताप यांनी गुन्ह्याचा तपास करून आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले.

विशेष सरकारी वकील राजेश कावेडिया यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. त्यांनी एकूण २९ साक्षीदार तपासले. चिमुकलीला आरोपीसोबत पाहणारी गावातील महिला, मुलीचे शवविच्छेदन आणि आरोपीची वैद्यकीय तपासणी करणारे डॉक्टर आणि आरोपीच्या घर झडतीच्या वेळी उपस्थित सरकारी पंच यांची साक्ष महत्त्वाची ठरली. आरोपीने अल्पवयीन मुलीवर बलात्कार करत तिचा खून केला असून, त्याला फाशीची शिक्षा द्यावी, असा युक्तिवाद विशेष सरकारी वकिलांनी केला. त्यासाठी त्यांनी सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या निवाड्याचे दाखले दिले, तसेच दिल्लीतील ‘निर्भया’ प्रकरणानंतर भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ एबी तरतुदीत झालेल्या बदलांचा आधार घेत आरोपीला ‘डेथ पेनल्टी’ देण्याची मागणी केली. बचाव पक्षातर्फे ॲड. यशपाल पुरोहित यांनी काम पाहिले.

**अशी केली हत्या**

आरोपीला अश्लील व्हिडिओ पाहण्याचे व्यसन होते, तसेच हातात सुरा असलेले फोटो तो समाजमाध्यमांवर टाकायचा. घटनेच्या दिवशी आरोपीने घराशेजारी खेळत असलेल्या चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून घरी नेत मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखविले आणि बलात्कार केला. त्याला विरोध केल्याने आरोपीने चिमुकलीचा गळा आवळला. त्यात तिचा मृत्यू झाल्याचे समजून तिला मोहरीत टाकले. मात्र, तिचा आवाज आल्यावर आरोपीने चाकूने तिच्या गळ्यावर चार वेळा वार करून तिचा निर्घृण खून केला. तिचा मृतदेह पोत्यात टाकून घराच्या पाठीमागे पुरला. त्यावर फांद्या लावून त्याने गावातून पुण्याच्या दिशेने पोबारा केला. दुसऱ्या दिवशी तो थेट कामावर निघून गेला.

# महिला कर्मचारी, दिव्यांगांना निवडणुकीच्या कामातुन वगळा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : महिला कर्मचारी, दिव्यांग कर्मचारी, गंभीर आजार असलेले कर्मचारी यांना निवडणुकीच्या कामातुन वगळण्यात यावे. तसेच प्राथमिक शिक्षकांना केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती देऊ नये याबाबतच्या मागण्यांचे निवेदन माण तालुका शिक्षक समितीच्या वतीने माणचे नायब तहसीलदार तहसीलदार श्री वट्टे यांना देण्यात आले.



**नायब तहसीलदार श्री. वट्टे यांना निवेदन देताना शिक्षक समितीचे अध्यक्ष संतोष घोडके व कार्यकर्ते**

यापसंगी श्रीकात दोरगे उपाध्यक्ष, एम.डी.दडस, संतोष घोडके, नितीन काळे, महेद्र शिलवंत, महादेव महानवर, नवनाथ खरात, आकाराम ओबासे, प्रमोद मंगरुळे, विनोद शिलवंत, कालिदास जाधव, श्री. कोलवडकर, प्रवीण शिलवंत आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# एप्रिल व मे महिन्यातील विभागीय लोकशाही दिन रद्द

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. या निवडणुकीची दि. १६ मार्च २०२४ पासून आचारसंहिता सुरू झाली असून दि. ६ जून २०२४ पर्यंत आचारसंहिता लागू राहील. आचारसंहिता कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन करू नये असे शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २६ सप्टेंबर २०१२ च्या परिपत्रकात नमूद केले आहे.




या अनुषंगाने पूणे विभागातील दरमहा दुसऱ्या सोमवारी होणारा विभागीय लोकशाही दिन माहे एप्रिल २०२४ व माहे मे २०२४ मध्ये आयोजित केला जाणार नाही, असे विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे. पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या पाचही जिल्ह्यांमध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात येणार आहेत.

# विशेष मुलीवर बलात्कार, केअर टेकरला १० वर्षे सक्तमजुरी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : स्वयंसेवी संस्थेत २० वर्षीय विशेष मुलीवर ६० वर्षीय ‘केअर टेकर’ने बलात्कार केला. या प्रकारानंतर पीडितेचे लग्न झाले असल्यामुळे न्यायालयात तिची साक्ष झाली नाही. मात्र, तिने बाळाला जन्म दिला आहे. डीएनए रिपोर्टवरून हे बाळ आरोपीचेच असल्याचे निष्पन्न झाले. हा पुरावा शिक्षेसाठी महत्त्वाचा ठरला. पुराव्यानुसार केअर टेकरला १० वर्षे सक्तमजुरी आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. पी. नांदेडकर यांनी सुनावली. दंड न भरल्यास १५ दिवस अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही आदेशात म्हटले आहे.

श्याम दिवाकर काकडे असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत संस्थेच्या महिला अध्यक्षांनी हवेली पोलिसात फिर्याद दिली आहे. हवेली तालुक्यातील स्वयंसेवी संस्थेमध्ये जून २०१६ आणि त्या पूर्वीचा काही कालावधी आणि २० मार्च २०१७ या कालावधीत ही घटना घडली. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील मारुती वाडेकर यांनी काम पाहिले. त्यांनी ७ साक्षीदार तपासले. त्यामध्ये संस्थेच्या महिलाध्यक्षा, विशेष मुलीच्या शाळेचे अध्यक्ष, महिला सामाजिक कार्यकर्त्या, तपासी अंमलदार आणि ससूनच्या डॉक्टरांची साक्ष महत्त्वाची ठरली.या संस्थेत दोन तरुणींसह नऊ महिला व तीन पुरुष आहेत. त्यापैकी काकडे हा केअर टेकर आहे. पीडितेला कामे सांगून आणि इतर प्रकारे त्याने त्रास दिला. तिच्याशी वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले. यातून पीडिता गर्भवती राहिली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. निवृत्त पोलिस निरीक्षक कैलास पिंगळे आणि उपनिरीक्षक आर. के. वाईकर यांनी या प्रकरणाचा तपास केला. जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून सहायक पोलिस निरीक्षक आकाश पवार, सत्र न्यायालय कोर्ट पैरवी अंमलदार सहायक पोलिस उपनिरीक्षक विद्याधर निचित, पैरवी कर्मचारी हवालदार सचिन अडसूळ यांनी मदत केली.

# ‘शेअर ट्रेडिंग’मध्ये नफ्याचे आमिष पडले ३८ लाखांना

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पिंपरी : फेसबुक या सोशल माध्यमावर शेअर मार्केटमध्ये जास्त पैसे मिळवून देण्याची जाहिरात टाकली. त्या माध्यमातून बँक खात्यावर पैसे घेत फसवणूक केली. ही घटना १४ डिसेंबर २०२४ ते गुरुवार (दि. २१) या कालावधीत पिंपळे सौदागर येथे घडली. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली आहे. त्यानुसार, जीतु शर्मा, आर्यन खान, मुतु कुमार, डेव्हिण पेटीयर, सुझान बेलामी, अमित शहा, दिया वर्मा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपींनी फेसबुक या सामाजिक माध्यमावर शेअर मार्केटमध्ये जास्त पैसे मिळवून देतो अशी जाहिरात टाकली. जाहीरातीच्या माध्यमातून व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये फिर्यादी यांना घेतले. त्या ठिकाणी शेअर मार्केटमध्ये अधिक पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवले. फिर्यादी यांचा विश्वास संपादन करत त्यांच्याकडून वेगवेगळ्या बँक अकाउंटवर ३८ लाख ६ हजार रुपये घेतले. त्याचा त्यांना परतावा न देता त्यांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



**म्हसवड : येथील क्रांतिवीर संकुलात डॉ. नागनाथ अण्णा यांचा स्मृतिदिन निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर**

# क्रांतिवीर संकुलात डॉ. नागनाथ अण्णा यांचा स्मृतिदिन संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : थोर समाजसेवक पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांचा १२ वा स्मृतिदिन क्रांतिवीर शैक्षणिक संकुल म्हसवड येथे संपन्न झाला. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी शाळा म्हसवड येथे नागनाथ अण्णांचा १२ वा स्मृतिदिन कार्यक्रम आयोजित केलेला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष कृषिरत्न प्रा. विश्वंभर बाबर होते तर प्रमुख मान्यवर म्हणून संस्था सचिव मुख्याध्यापिका सुलोचना बाबर, मुख्याध्यापक अनिल माने व पूनम जाधव तसेच संकुलातील शिक्षक इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नागनाथ अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. विश्वंभर बाबर म्हणाले स्वर्गीय नागनाथ अण्णा यांच्या कार्याचा आढावा घेतला. तर शौर्य माने, तुषार घुटुकडे, सौम्या पोळ, तनिष्क विरकर, अजिंक्य राऊत, सृष्टी सावंत या विद्यार्थ्यांनी क्रांतिवीर अण्णांच्या जीवन कार्याबाबतचे मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शौर्या सरतापे व संस्कृती माने या विद्यार्थ्यांनी केले तर उपस्थितांचे आभार सृष्टी लुबाळ हिने मानले.

# ईव्हीएम लावण्यासाठी जास्तीत जास्त ३८४ उमेदवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : मराठा आरक्षण आंदोलकांनी प्रत्येक गावातून किमान दोन उमेदवार देण्याची घोषणा केल्यानंतर एका मतदारसंघात शेकडो उमेदवार रिंगणात असण्याशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार एका मतदारसंघात जास्तीत जास्त ३८४ उमेदवारांसाठी २४ ईव्हीएम उपलब्ध करून देता येणे शक्य आहे. मात्र, त्यापेक्षा अधिक उमेदवार उभे राहिल्यास निवडणूक मतपत्रिकेवर घ्यावी की ईव्हीएमवरच घ्यावी याबाबत अद्यापही केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्पष्ट निर्देश आलेले नाहीत. किमान ३८४ उमेदवार असले तरी मतदान घेण्यासाठी मोठी तारांबळ उडेल, अशी भीती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बोलून दाखवली आहे.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी आंदोलन पुकारले आहे. मात्र, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न मिळाल्यास लोकसभा निवडणुकीसाठी प्रत्येक गावातून २ उमेदवार देण्याची घोषणा केली



आहे. या पार्श्वभूमीवर ३८४ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास निवडणूक यंत्रणा याबाबत सक्षम नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यापूर्वी अशी परिस्थिती उद्भवलेली नाही. त्यामुळे उमेदवार वाढल्यास आयोगाला संबंधित मतदारसंघात जादा ईव्हीएम यंत्रांची व्यवस्था करावी लागणार आहे. ही निवडणूक सार्वत्रिक असल्याने सर्वच राज्यांमध्ये ईव्हीएमची आवश्यकता भासेल. त्यामुळे ज्या राज्यांमध्ये निवडणूक संपली, अशा ठिकाणांहून ही यंत्रे आणावी लागणार आहेत.

किमान ३८४ उमेदवार असल्यास २४ यंत्रे लावण्यासाठी त्या तुलनेत कंट्रोल युनिट लावावे लागणार आहेत. आयोगाच्या निर्देशांनुसार व्हीव्हीपॅट यंत्रांचीही सोय करावी लागणार आहे. मात्र, सध्याचे निवडण्यात आलेले मतदान केंद्र हे बहुतांशी शाळांमध्येच असल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणावर यंत्रे ठेवण्यासाठी टेबलची व्यवस्था करावी लागणार आहे. त्यामुळे केंद्र खोलीत जागा शिल्लक राहील का, असा प्रश्न वरिष्ठ अधिकाऱ्यांना पडला आहे. याबाबत अद्याप कोणतेही नियोजन नसल्याचे अनेक अधिकारी खासगीत मान्य करत आहेत. त्यामुळे उमेदवार वाढल्यास यंत्रणा कशी उभी करावी, याबाबत संभ्रम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

याबाबत राज्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील सूत्रांच्या मते उमेदवारांच्या संख्येबाबतचे अंतिम चित्र अर्ज माघारीनंतर स्पष्ट होणार आहे. त्यामुळे त्याविषयी आताच सांगणे कठीण आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानेही याबाबत कोणतेही स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. ही निवडणूक ईव्हीएमवरच होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, ३८४ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास मतपत्रिकेचा वापर होईल का, या प्रश्नावर त्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे बोट दाखवले आहे.

ईव्हीएम यंत्रांद्वारे मतदान घेण्यास सुरुवात होण्यापूर्वी मतदान पत्रिका छापल्या जात होत्या. त्यामुळे त्यासाठी उमेदवारांची मर्यादा नव्हती. ईव्हीएम आल्यानंतर उमेदवारांची संख्या कमी राहावी यासाठी डिपॉझिट आणि अनुमोदकांची संख्या वाढविण्यात आली. त्यामुळे आतापर्यंत कोणत्याही मतदारसंघात ३८४ पेक्षा जास्त उमेदवार उभे राहिले नसल्याचे निवडणूक यंत्रणेतील जाणकार अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. निवडणूक लढविण्यासाठी एका उमेदवाराला २५ हजार रुपयांची अनामत अर्थात डिपॉझिटची रक्कम भरावी लागते. मागासवर्गीय उमेदवारांना ही मर्यादा १२ हजार ५०० रुपये इतकी आहे. त्यासाठी किमान १० अनुमोदक असावे लागतात. या अटी पूर्ण करणाऱ्यांना निवडणूक लढविता येते. त्यानुसार मराठा समाजाने केलेल्या घोषणेनुसार ३८४ पेक्षा जास्त उमेदवार निवडणुकीला उभे राहिल्यास निवडणूक आयोग काय निर्णय घेईल, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# प्रेमामध्ये फसली, युवतीने जीवनयात्राच संपवली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कडेगाव : कडेगाव तालुक्यात एका १७ वर्षीय मुलीस प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक केल्यामुळे तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. तिच्या वडिलांनी कडेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार संशयित तेजस पवार (पूर्ण नाव, पत्ता नाही) याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत माहिती अशी, कडेगाव तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीस संशयित तेजसने जानेवारी २०२४ मध्ये फूस लावून प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिची फसवणूक केली. फसवले गेल्याचे लक्षात येताच युवतीला धक्का बसला. तिने दि. २० रोजी मध्यरात्रीनंतर साडेबाराच्या सुमारास राहत्या घरातील अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास लावून घेऊन आत्महत्या केली.

हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर कुटुंबीयांना धक्का बसला. युवतीच्या वडिलांनी कडेगाव पोलिस ठाण्यात संशयित तेजस पवार याच्याविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार युवतीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल तेजसवर गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध सुरू असल्याचे कडेगाव पोलिसांनी सांगितले.